# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०९/२०२६ (बुधवार )**

..................................................................................................

## अंमली पदार्थ गांजा ची अवैध वाहतुक करणारे ३ आरोपी अटक
## ०८ किलो ८६८ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा जप्त,
## १२ लाख ९ हजारांचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान – **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि अंमली पदार्थ विरोधी पथक यांनी गोपनिय माहीतीच्या आधारे अंमली पदार्थ गांजाची वाहतुक करणाऱ्या तीन आरोपींना अटक करून ८ किलो ८६८ ग्रॅम अंमली पदार्थ जप्त केला आहे.**

दिनांक ०८/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि अंमली पदार्थ विरोधी पथक यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या गांजाची वाहतुक केली जात आहे. नमुद पथकाने संयुक्तरित्या कारवाई करत सतर्कतेने पेट्रोलींग केली असता कन्हान येथून मनसर रोडने टोपाज हॉटेलजवळील तार कंपनी समोरील फाट्याजवळ एक संशयीत वाहन महींद्रा वाहन क्र. यु पी ५७ बी पी ७६१० मिळुन आले. नमुद संशयीत वाहनाची झडती घेतली असता वाहनाच्या डिक्कीत संशयास्पदरीत्या पॅक करून ठेवलेले एकूण ०९ नग पार्सल आढळून आले. पंचांसमक्ष सदर पार्सल उघडून पाहिले असता त्यामध्ये हिरव्या रंगाची पाने, कळ्या व देठ असलेला ओलसर अंमली पदार्थ गांजा सदृश मुद्देमाल मिळुन आला. **आरोपी क्र. १) कन्हैया उर्फ शुभम कपिलदेव शाही, वय ३२ वर्षे, रा. गुरुद्वारासमोर, कांद्री, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर २) हिमांशू नंदलाल शर्मा, वय २५ वर्षे, रा. दिघेडा पोस्ट अरसूपूर, ता. मधुबन, जि. महू, उत्तर प्रदेश आणि ३) सुरज**

राजेंद्र चव्हाण, वय ३२ वर्षे, रा. ताडी पोस्ट धरमपूर, बिसणपूर, ता. मधुबन, जि. महू, उत्तर प्रदेश हे मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष अंमली पदार्थ गांजा वजन ०८ किलो ८६८ ग्रॅम किंमती १,७७,३४०/—रूपये, महींद्रा वाहन क्र. यु पी ५७ बी पी ७६१० किंमती १०,००,०००/—रूपये, आणि ०३ ॲडरॉईड मोबाईल, रोख २५००/—रूपये, गांजाचे पॅकिंग करण्यासाठी वापरलेले साहित्य व इतर मुद्देमाल असा एकुण १२,०९,८४०/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ८ (क), २०(ब)(ii)(ब), २२,२९ एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.




## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०९/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या

**दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन सावनेर, खापा, पाचगाव, कुही, वेलतूर च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.**

**पोलीस स्टेशन सावनेर** :— श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री ऋतुजा जाधव, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांच्यासह सावनेर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी सावनेर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन खापा** :— श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांच्यासह खापा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी खापा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच त्यानंतर  दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांच्यासह पाचगाव पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी पाचगाव शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कुही** :— पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र पाटील, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कुही यांच्यासह कुही पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी कुही शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व

संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन वेलतूर** :— पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतूर यांच्यासह वेलतूर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी वेलतूर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**






XEROX




NAVYUG
PRIDE & PLAY SCHOOL
MH31GG1482


चौधरी रेडीमेड
& बॅग हाऊस


XEROX


POLICE



## १२ तासाच्या आत चोरीचा गुन्हा उघड, ५ आरोपी अटक, ३९ लाख ९२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त वडोदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा :— **मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. शशांत एन. एम. सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली  तसेच सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांच्या नेतृत्वात दिनांक ०८/०९/२०२६ रोजी वडोदा पोलीसांनी पोलीस स्टेशन वडोदा हद्दीतील पॅरामाउंट कंपनीमधील ०९ टन वजनाच्या लोखंडी कॉइल चोरीच्या गुन्ह्याचा तपास करून १२ तासाच्या आत गुन्हा उघडकीस आणला असून, सदर गुन्हयात पाच आरोपींना अटक करण्यात आली असुन आरोपींकडून एकूण ३९,९२,०००/—रुपयांचा मुद्देमाल' जप्त करण्यात आला आहे.**

पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत फिर्यादी नामे महेश प्रद्युम्न गोयंका, वय ५६ वर्षे, रा. देशपांडे लेआउट, वर्धमान नगर, नागपूर यांनी पोलीस ठाणे, वडोदा येथे येवुन रिपोर्ट दिली की, दि. ०१/०९/२०२६ ते  दिनांक ०५/०९/२०२६ रोजी दरम्यान पॅरामाउंट कंपनीमधील कोणीतरी अज्ञात चोरटयांनी लोखंडी पत्रे बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ०९ टन वजनाच्या लोखंडी कॉइल चोरी करून नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन वडोदा येथे दिनांक ०८/०९/२०२६ रोजी कलम ३०५(अ) भान्यासं  अन्वये गुन्हा नोंद आहे.

वडोदा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यात तपासादरम्यान कंपनीत काम करणारे काही कामगार व वॉचमन यांनी आपसात संगनमत करून सदर चोरीचा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर गुन्हयातील आरोपी **१) भूषण गोविंद बुरेवार, वय ४५ वर्षे, रा. वाडेपुरा, ता. कामठी, जि. नागपूर २) शुभम दत्तूजी चिखलकर, वय २९ वर्षे, रा. सोनेगाव, ता. कामठी, जि. नागपूर ३) सैसाद शमशाद शहा, वय ३४ वर्षे, रा. कामठी, जि. नागपूर ४) आकाश सुधाकर डोळसे, वय २६ वर्षे, रा. गुमथळा, ता. कामठी, जि. नागपूर ५) जाफर अली नजीर अली, वय ३५ वर्षे, रा. बहादूर रोड, मिलन नगर, खरबी, नागपूर** यांना

दिनांक ०८/०९/२०२६ रोजी ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची माहीती दिली.

**पोलीसांनी नमुद आरोपीकडुन १) ०६ टन वजनाच्या दोन लोखंडी कॉइल किंमती ५,४०,०००/—रूपये २) ०३ टन वजनाच्या दोन लोखंडी कॉइल किंमती २,७०,०००/—रूपये ३) रोख रक्कम १,८२,०००/—रूपये ४) गुन्ह्यात वापरण्यात आलेला ट्रक क्रमांक एम एच—४०/ए के—१३५४ किंमती ३०,००,०००/—रूपये असा एकुण ३९,९२,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्हयातील नमुद पाच आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.**





## ४ गुन्हे उघड
## जबरी चोरी व घरफोडी करणाऱ्या ०३ आरोपीतांना अटक,
## ६ लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जबरी चोरीचा १ गुन्हा आणि घरफोडीचे ०३ गुन्हे असे ०४ गुन्हे उघडकीस आणुन एकुण ३ आरोपींना अटक केले आहे.**

पोलीस स्टेशन पारशिवनी येथे दाखल अपराध क्रमांक ४७३/२६ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. गुन्हयाचा समांतर तपास करीत असता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यात आरोपी **१) सुरज**

भैय्यालाल केराम, वय ३६ वर्ष, रा चित्तरंजन नगर कामठी २) शेख जाफर शेख मुजफ्फर, वय ४५ वर्ष, रा.कामगार नगर कामठी ३) शेख सलीम शेख शब्बीर, वय ४५ वर्ष, रा. कामठी यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न केले. दिनांक ०८/०९/२०२६ रोजी आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे जबरी चोरी, पोलीस स्टेशन कन्हान येथे दोन घरफोडी चे गुन्हे तसेच कुही हद्दीत एक घरफोडी केल्याची माहीती दिली.

आरोपीतांकडुन पंचासमक्ष सोन्याचांदीचा ऐवज किंमती ६,२३,९७६/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे**

१) पोस्टे पारशिवनी अप. क्रमांक ४७३/२६ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं

२) पोस्टे कन्हान अप. क्रमांक ४८८/२६ कलम ३३१(३), ३३१(४),३०५(अ) भा.न्या.सं

३) पोस्टे कन्हान अप. क्रमांक ५५२/२६ कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं

४) पोस्टे कुही अप. क्रमांक ४६३/२६ कलम ३०५(अ), ३३१(३) भा.न्या.सं

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ५ जनावरांची सुटका, भिवापुर पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर :—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मस्कर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापुर यांच्या नेतृत्वात भिवापुर पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई करून एकुण ०४ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक ०९/०९/२०२६ रोजीचे भिवापुर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, अवैद्यरित्या गोवशांची वाहतुक होत आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी सदर वाहनाची शोध मोहीम सुरू केली मोखाळा भिवापुर रोडवर मोखाळा फाटयाजवळ महींद्रा बोलेरो एम एच ३५ ऐ जे ५८०२ हे वाहन मिळुन

आले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनाचे मागील डाल्यात ५ गोवंश अत्यंत निर्दयतेने कोंबुन , जनावरांची चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी क्र १) चालक नामे महेश शिवप्रसाद मोहारे, वय २७ वर्ष, रा. मुंडीपार ,सालेकसा जि गोंदीयसा आणि त्यासोबत असलेले आरोपी क्र २) चमनलाल नितलाल सिहोरे, वय २५ वर्ष, रा. ब्राम्हणी, ता सालेकस जि गोंदीया आणि आरोपी क्र ३) जयप्रकाश मदनलाल मछिया, वय ३३ वर्ष, रा बडगाव, लांजी , जि बालाघाट मध्यप्रदेश यांनी मिळुन अवैधरित्या जनावरांची वाहतुक केल्याची माहीती प्राप्त झाली

पोलीसांनी पंचासमक्ष १) महींद्रा बोलेरो एमएच ३५ ऐजे ५८०२ किंमती ३,५०,०००/— रुपये २) ५ गोवंश जनावरे किंमती १,००,०००/— रुपये असा एकुण ४,५०,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपी यांचे विरुद्ध कलम ११(१) (ड), ११(१) (इ), ११(१) (एफ) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनीयन अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ०४ गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एन. एम. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. सारीन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांच्या नेतृत्वात मौदा पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई करून एकुण ०४ लाख ४० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक ०८/०९/२०२६ रोजी मौदा पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी महादुला फाटा येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान महींद्रा बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—३३/जी —१९८१ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०४ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निदर्यतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून महींद्रा बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच—३३/जी —१९८१ किंमती ४,००,०००/— रूपये आणि ०४ गोवंश जनावरे किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण किंमती ४,४०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी आरोपी चालक मालक यांच्या विरूध्द कलम २८१ भा.न्या.सं., सहकलम १८४, १७९ मोवाका. सहकलम ११(१), (ई), (ड), (फ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, ५ (अ), (१), ९ महा पशु सरक्षण अधि १९७६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण जिल्हयात घेतल्या प्रशासकीय बैठका, शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**आज दिनांक ०९/०९/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी गणेशोत्सव तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन काटोल** :— आगामी सणोत्सवाच्या अनुषंगाने उपविभागिय अधिकारी यांचे कार्यालय येथे सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या आंतरविभागीय समन्वय बैठकीत पोलीस निरीक्षक श्री रणजित शिरसाठ,प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल यांच्यासह नगरपरिषदेचे,तहसील कार्यालय, महावितरणचे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

तसेच पोलीस स्टेशन काटोल येथे पोलीस निरीक्षक श्री रणजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांच्या उपस्थितीत आगामी बैलपोळा सण उत्सवांच्या अनुषंगाने आयोजक यांची बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन खापा** :— पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांच्या उपस्थितीत आगामी गणेशोत्सव व इतर सण—उत्सवांच्या अनुषंगाने विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी व सदस्य तसेच डीजे चालक मालक यांची बैठक घेण्यात आली.


महाराष्ट्र शासन


न्यायालयीन सुनावणी तक्ता
पोलीस



## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, १ लाख ८८ हजार ९०० रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ०७/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा गोंडखैरी वार्ड क्र. ०५ येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौजा गोंडखैरी वार्ड क्र. ०५ येथे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) ईरफान ईकबाल कुरेशी, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. ५, गोंडखैरी २) मोहम्मद आलम शेख, वय ३८ वर्ष, रा. पुरपटटी मेहबाग प्रयागराज, युपी ह.मु. हिंगण नागपुर ३) सलिम ईकबाल कुरेशी, वय ३८ वर्ष, रा. वार्ड क्र. ५, गोंडखैरी यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम ८९००/—रूपये, ०३ अॅन्ड्राईड मोबाईल, २ नग दुचाकी वाहने असा एकुण १,८८,९००/— रूपयांचा**

**मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूद्ध कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन मौदा :-** दिनांक ०७/०९/२०२६ रोजी मौदा पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी नामे १) हरीश धर्मा कोरेवार, वय ३१ वर्ष,२) अजय सुनील लाटनकर, वय २५ वर्ष, रा. तारसा ज्वाईट ता मौदा हे तारसा शिवार येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आले. त्यास त्यांचे नाव व गाव विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपींचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १० गुन्हे नोंद

**दिनांक ०८/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण १० गुन्हे दाखल करण्यात आले .**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) प्रदीप दामोधर कळंब, वय ४३ वर्ष, रा.लोहारीसावंगा, ता. नरखेड २) गोपागोनी कनकैया रामास्वमी, वय ५५ वर्ष, रा. नेरमेट्टा, जि. वरंगल, राज्य तेलंगाना, ह. मु जलालखेडा यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) पन्नालाल रेवजी गोयते, वय ४५ वर्ष, रा. खेडी, ता. नरखेड २) उदयसिंग मानिकराव कवडती, वय ४५ वर्ष, रा. गोवार गोंगदी, तह. नरखेड जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, तसेच आरोपी १) संजय रातदास कवडती, वय ३८ वर्षे, रा. मेघनाथ वार्ड पांढुर्णा, तह. जि. पांढुर्णा (मध्य प्रदेश) २) रंजित सुरेशराव वाहणे, वय ३२

वर्षे, रा. मोहदी दळवी, तह. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** आरोपी १) शालीक फुकट पेदाम, वय ५१ वर्ष, रा. वानोडा, तह उमरेड २) धिरज पचंम मेश्राम, वय ४१ वर्ष, रा. खुर्सापार, ता. उमरेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव अंतर्गत** आरोपी देवाजी काशिनाथ माहुले, वय ४९ वर्षे रा. प्लॉट नं. ५१, उमरेड रोड, चिटणीस नगर,, मोठा ताजबाग, नागपूर यांचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत ०२ महिला** आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १२५१० मिली देशी दारू, ८६ लिटर मोहाफुल दारू, असा एकुण १४,१८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपुर ग्रामीण जिल्हा**